# घराणे ४ थें, पंचनदी-ग्वाल्हेर

या घराण्याचा ज्ञात मूळ पुरुष गणेश. हें घराणें मूळचें पंचनदीचे. तेथून बाळाजी गणेश (२) हे आंग्रे यांचेबरोबर त्यांचे पदरचे म्हणून ग्वाल्हेर येथे गेले. आणि तेथें स्थायिक झाले. सध्यां यांचें वास्तव्य आमझारा आणि ग्वाल्हेर येथें आहे.

कुलस्वामी - या घराण्याचा कुलस्वामी कोळथ-याचा कोळेश्र्वर. याचे जोडीस रामेश्र्वर आणि जोगेश्र्वरी यांनाहि कुलस्वामी आणि कुलस्वामिनी मानितात.

कुलधर्म - देवदिवाळीत नैवेद्य न घालतां चैत्र शु. १ आणि दसरा या दिवशी कोळेश्वर रामेश्वर,जोगेश्वरी (आणि बहुदा सत्येश्वर असावा)इत्यादि .चार देवतास नैवेद्य घालीतात

कुलाचार - शारदीय नवरात्रात अखंड दीप नि माळ असते.शेवटच्या दिवशी ब्राम्हण नि सुवासिनी भोजनास सांगतात, या घराण्यांत वरील आचार पूर्वी नव्हते. गेल्या दोन पिढयांपासून कांही नवसामुळें चालू झाले आहेत. मंगलकार्यानंतर बोडण भरतात. महालक्ष्मीचें व्रत आहे. गोंधळ नाहीं.

या घराण्यास वतन नाही.

या घराण्यांत पिढया ५, एकूण व्यक्ति ७ नि विद्यमान व्यक्ति ३ आहेत.

(२) बाळाजी गणेश - श्री. आंग्रे यांचेबरोबर ग्वाल्हेर येथें गेले. तेथें आंग्रे यांचेकडे नोकरी होती. भार्या आनंदी. अपत्ये १ कन्या, २ पुत्र

(३) कु-----बाळाजी गणेश - ग्वाल्हेरचे विनायकशास्त्री भारतीबोवा यांची पत्नी

(३) गणपती बाळाजी गणेश - मृ. ७० व्या वर्षी. नगर येथें वकिली करीत.

(३) वासुदेव बाळाजी गणेश - मृ.स.१९२९. वय ५५, ग्वाल्हेर. आंग्रे यांचे पदरी नोकरी होती. भार्या लक्ष्मी, पि. चितळे, रा.ग्वाल्हेर. अपत्ये ५ कन्या २पुत्र

(४) दुर्गा वासुदेव बाळाजी - भ्र. नारायण वामन आमडेकर, रा.ग्वाल्हेर.

(४) वेणू वासुदेव बाळाजी - (सारजा) भ्र. विनायक रावजी चितळे, ग्वाल्हेर.

(४) अंबू वासुदेव बाळाजी - भ्र. भालचंद्रपंत टिळक, रा.काशी.

(४) गंगू वासुदेव बाळाजी - (रुक्मिणी), भ्र. पुरुषोत्तम नारायण सोमण, रा.उज्जयिनी.

(४) द्वारका वासुदेव बाळाजी - भ्र. यशवंत गोपाळ केळकर, ग्वाल्हेर.

(४)गोविंद वासुदेव बाळाजी - ज. संवत् १९५९. वै. व. ३. ग्वाल्हेर संस्थानांत आमझारा (जि. सरदारपुर) येथें पी. डब्ल्यु.डी. मध्यें ओव्हरसीअर होते. भार्या (१) राधा (छबू), मृ. संवत् १९८८. पि. दामोदरशास्त्री जोशी, रा.उज्जयिनी. हिला अपत्य नाहीं. भार्या (२) राधा (अनसूया), शिक्षण मराठी. पि. लक्ष्मण नारायण आचवल, रा.भेलसा.अपत्ये १ पुत्र

(५)धोंडो गोविंद वासुदेव - ज.स.१९४० नोव्हेंबर.

(४)सावळाराम वासुदेव बाळाजी - ज. संवत् १९६६ फा. शु. ११. शिक्षण मॅाट्रिकपर्यंत. ग्वाल्हेर येथें अलिजा-दरबार मुद्रणालयांत कंपोझिटर आहेत. प्रॉव्हिडेंट फंड आहे. आंग्रे यांचे गोटांत राहतात. भार्या जानकी (बबी), पि. केशव गोविंद केळकर, रा.ग्वाल्हेर.

## घराणे २० वें, पंचनदी-नागपूर १

या घराण्याचा ज्ञात मूळ पुरुष केशव. हें घराणें मूळचें पंचनदीचें. तेथून हे पहिले रघुजीराव भोसले यांच्या आश्रयानें नागपुर प्रांती गेले आणि तेथें स्थायिक झाले. याच घराण्यांतील एक पुरुष फौजेंतील अधिकारी या नात्याने भोसले यांचे बरोबर पानिपतचे युध्दांत होते असें कळतें. सध्यां यांचें वास्तव्य डोंगरगड, द्रुग, नागपुर, रायपुर, विलासपूर इत्यादि गांवी आहे.

कुलस्वामी - या घराण्याचा कोंकणांशी संबंध सुटून जवळ जवळ २२५ वर्षे झाल्यामुळे कोंकणचा कुलस्वामी, कुलधर्म, कुलाचार यांचा यांना विसर पडला आहे. त्यामुळे हे गिरीच्या वेंकटेशास कुलस्वामी मानितात. यानंतर यांनी कोळथरें येथील कोळेश्र्वर कुलस्वामी मानावा.

कुलधर्म - वार्षिक नेवैद्याची प्रथा यांचेकडे बंद पडली आहे. यानंतर यांनी देवदिवाळीस कोळेश्र्वर, सत्येश्र्वर, योगेश्र्वर आणि इतर इष्ट देवतांस नैवेद्य घालावेत.

कुलाचार - शारदीय नवरात्रांत यांचेकडे बालाजीचें नवरात्र असतें. तेव्हां अखंडदीप, माळ, लक्ष्मीनारायण हृदयाचा पाठ असून नित्य ब्राम्हण सुवासिनी यांना भोजन असतें. बोडणाची प्रथा नाही. कारण कोंकणचा संबंध सुटून बहुत काल लोटला. आणि यांचे बरेचसें विवाहसंबंध तद्देशीय देशस्थ ब्राम्हण मंडळीशी झालें आहेत.

या घराण्यास वतन नाही. नागपूर येथील भोसले यांचे दप्तरांत शोध केल्यास काही कागदपत्र मिळण्याचा संभव आहे.

या घराण्यांत पिढया ७, एकूण व्यक्ति ३४ नि विद्यमान व्यक्ति २० (दोन शाखा मिळून) आहेत.

(दुस-या शाखेंतील माधव (३) आणि पहिल्या शाखेंतील रंगनाथ वासुदेव (३) हे नात्यानें चुलत वा चुलत चुलत बंधु व्हावेत, हें निश्र्चित. पुरेशा वंशावळीच्या अभावी जोडून दाखवितां येत नाहीत.)

### शाखा १ ली

(१) केशव कोंकणांतून नागपूर येथें गेले. तेथें भोसल्यांचे पदरीं होते. पुढें रत्नपुर येथें सुभेदार झाले.

(४) श्रीधर रंगनाथ - मृ. सुमारें ६५ व्या वर्षी. भार्या काशी. यांना एक कन्या होती.

(५) यशवंत श्रीधर - ज. स. १८५२, मृ. स. १९००. खारपार संस्थानांत दिवाण होते.

(५) लक्ष्मण श्रीधर - ज. स. १८५७. मृ. स. १९२३. रायपूर जिल्हांत कोर्ट ऑफ वॉर्डसचे मॅनेजर होते. भार्या सारजा (चिमणी), ज. स. १८७०. पि. लक्ष्मण विश्र्वमर मोहरे (ऋ. देशस्थ). वि. स. १८८०. कन्या (१) कृष्णा (लक्ष्मी), भ्र. बापू गोविंद अध्यापक (कऱ्हाडे), रायपूर. (२) शांता, भ्र. गोविंद गोपाळ टोपें, द्रुग.

(६) विश्र्वनाथ (दादा) लक्ष्मण - ज. स. १८८६ जू. २५. मृ. स. १९४२. मॅट्रिक. मध्यप्रांतांत मुलकी खात्यांत १६ वर्षे नोकरी केली. पुढें नोकरीचें त्यागपत्र देऊन स. १९२१ पासून कलकत्यास तीन वर्षे मुद्रणकलेचें शिक्षण मिळविलें. स. १९२४ पासून नागपूर-नगरपालिकेच्या

मुद्रणालयाचे व्यवस्थापक होते. प्रॉव्हिडेंट फंड होता. वाचनाची पुष्कळ आवड असे. मानव जन्माचे रहस्य, आणि मनुष्य स्वभाव जाणण्यांची आकांशा असे. हू इज हू अँड व्हेअर महाराष्ट्रियनस् यांत यांचें अल्पसें चरित्र आले आहे. वास्तव्य शास्त्री अॅड सन्स, पेपर मर्चेट, वॉकर रोड, नागपूर. भार्या लक्ष्मी (सोनू) ज. स. १८९१, मृ. स. १९२४. पि. नारायण सदाशिव कुसरे (ऋ. देशस्थ) वकील, रायपूर. वि. स. १९०२. कन्या काशी (प्रभावती), ज. स. १९१२. भ्र. श्रीधर नागेश्र्वर वैद्य (ऋ. देशस्थ). वि. स. १९३०.

(७) वासुदेव विश्र्वनाथ - ज. स. १९०६ शिक्षण इंग्रजी ५ ईयत्ता. यांचे नागपुरास महाल-इतवारी रोडवर कागद नि स्टेशनरी सामानाचें दुकान आहे.

(६ )वामन लक्ष्मण - ज. स. १८९४. रायापुरास सुपरिटेंडिंग एंजिनिअरचें ऑफिसांत कारकून आहेत.

(७) यशवंत वामन - ज. स. १९४०.

(६) अनंत लक्ष्मण -ज. स. १८९७. बंगाल-नागपूर रेल्वेच्या डोंगरगड स्टेशनवर लोको ऑफिसांत कारकून आहेत.

(७ )मनोहर अनंत -

(६)नारायण लक्ष्मण - ज. स. १८९९. अलिकडे १४ वर्षे ठिकाण माहीत नाही.

(६) दत्तात्रेय लक्ष्मण - ज. स. १९०४. द्रुग (मध्यप्रांत) येथें कॅटलपौड (कोंडवाडा) इन्स्पेक्टर आहेत.

(६) गंगाधर लक्ष्मण - ज. स. १९०९. कीर्तनकार आहेत. रायपुरास असतात.

(६) गजानन लक्ष्मण - ज.स.१९०९ कीर्तनकार होते.रायपुरास होते.

(५) विठ्ठल (बापूजी) श्रीधर - मृ. स. १९२८ ऑग. ३०. वय ७५.

(६) गंगाधर खंडेराव - बी.एन्. रेल्वेकडे बिलासपूर येथें नोकरी आहे. यांना तीन पुत्र आहेत.

(६) शंकर खंडेराव - बी.एन. रेल्वेकडे नोकरी आहे.

## शाखा २ री

(४) रघूत्तम माधव - मृ. श. सुमारें १८५५. } यांची मालगुजारी गावे
(५) वेंकटेश रघूत्तम - मृ. श. सुमारें १८६३ } आहेत.

भोसल्यांचे कारकीदींत रायपुरचा सुभा प्रथम चालविणारे तात्याजी मोडक. त्यांच्या नांवावर रायपूरचा एक भाग तात्यापारा म्हणून ओळखिला जातो. हे रायपुरास स. १७६१ ते १७७० पर्यंत असावेत. स. १८१८ पर्यंत यांचे वंशज रायपुरास सुभेदार होते. तात्याजींचे नांव कळलें नाही.

(६) मुकुंद रघूत्तम - डॉक्टर आहेत.